**नि.दि.दा. क्र. १०७/२०२३**
वनिता वि कार्यकारी अभियंता
**निशाणी क्र. ३८**

**<u>वादीतर्फे साक्षीदारची जबानी शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – वलीउल्ला न्यामतउल्ला काझी
**वय** – ५७ वर्षे,
**व्यवसाय** – नोकरी, स.पो.फौ. ब.नं. ५०४ नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव.
**राहणार** – उपळाई बु. ता. माढा, जि. सोलापुर.

**<u>साक्षीदारचा सरतपास शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एन. माने यांचेमार्फत सुरु:–</u>**

१. सन २०१५ मध्ये मी पोलीस स्टेशन परंडा येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होतो. वनिता उत्तम शिंदे हे दिनांक ०२/०३/२०१५ रोजी पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे गट क्र. ४३९ मधील ऊसाच्या पीकाचे शॉट सर्कीटने जळुन नुकसान झाले आहे म्हणुन आले होते. त्यांनी दिलेल्या अर्जावरुन ठाणे अंमलदार यांनी स्टेशन डायरी क्र. ६१/२०१५ नोंद क्र. ३० वेळ १८.३० वाजता नोंद घेऊन पुढील तपास माझ्याकडे दिला. तपास माझ्याकडे आल्यानंतर दिनांक ०३/०३/२०१५ रोजी मौजे लोणी शिवार येथील गट क्र. ४३९ मध्ये गेलो. तेथे गेल्यानंतर वनिता शिंदे व दोन पंच हजर होते, त्यांचे समक्ष जळालेल्या ऊसाचा पंचनामा केला. जमीन अंदाजे एक एकर असावी, त्यामधील ऊसाचे पीक जळुन खाक झालेले होते. सदर क्षेत्रामधुन पुर्व–पश्चिम अशी विद्युत लाईन गेलेली होती. तपासाअंती ऊस हा शॉट सर्कीटने जळाला असावा. तसेच, ड्रीपच्या नळ्या आणि पाईप देखील जळालेले होते. सदरचा पंचनामा हा मी गट क्र. ४३९ मध्ये घटनास्थळावर केलेला आहे. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. तो पंचनामा तोच आहे. पंचनाम्यामधील हस्ताक्षर हे माझेच आहे. सदरचा पंचनामा हा मी स्वतः लिहिलेला आहे. सदरच्या पंचनाम्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहेत. पंचनाम्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येते.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>साक्षीदारचा उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस.पी.भालेराव यांचेमार्फत सुरु:–</u>**

**नि.दि.दा. क्र. १०७/२०२३**
वनिता वि कार्यकारी अभियंता
**निशाणी क्र. ३८**

२.    मी सध्या स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव येथे कार्यरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०२/०३/२०१५ रोजी पंचनामा केला. माझ्याकडे मुळ पंचनामा नाही. हे मला आठवत नाही की, मुळ पंचनामा घेण्याकरीता मी परंडा पोलीस स्टेशन येथे अर्ज दिला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्यावेळी पंच हे वादीने हजर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचांच्या सह्या कोऱ्या कागदावर घेतल्या होत्या व त्यानंतर पोलीस स्टेशन परंडा येथे मजकुर लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि वादीचे पती उत्तम यांची मी परंडा येथे असताना चांगली मैत्री होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीला फायदा व्हावा म्हणुन ओळखीच्या विश्वासावर सदरचा खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, ऊस ओला असतो. हे म्हणणे खरे आहे की, ऊसाला आग लागल्यानंतर त्याचा पाचोळा जळतो व ऊस तसा उभा राहतो. हे म्हणणे खरे आहे की, किती ऊस उभा होता हे मी सांगु शकत नाही. घटनास्थळी लाईटची तार तुटलेली दिसली नाही. साक्षीदार सांगतो की, तारामध्ये लुजपणा दिसला. तारातील घर्षण झालेली मी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो ऊस घर्षणाने जळालेला नाही असे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी ड्रीप, पाईपलाईन तेथे नव्हती. ड्रीप व पाईपलाईन वादीच्या आहेत याच्या पावत्या पाहिल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2025.07.31 16:41:41 +0530

दिनांकः ३१.०७.२०२५

**(आर. टी. इंगळे)**
सह दिवाणी न्यायालय व स्तर, परंडा.